जा.क्र.सपोआ/वाहतूक/प्रेसनोट/२०२४- 1409 छत्रपती संभाजीनगर, दिनांक २६/०८/२०२४.

## प्रेस नोट.

छत्रपती संभाजीनगर शहरात सालाबाद प्रमाणे, दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्त दिनांक २७/०८/२०२४ रोजी कोकणवाडी चौक, गुलमंडी, कॅनॉट प्लेस, टी.व्ही. सेंटर, गजानन महाराज मंदीर चौक ,निराला बाजार व शहरात इतर वेगवेगळया ठिकाणी लहान-मोठ्या दहीहंडीचा उत्सव साजरा करण्यात येतो. त्या ठिकाणी मोठया प्रमाणात जनसमुदाय, विविध गोविंदाची पथके सहभागी होणार आहेत. तेथील मार्गावर नागरिकांची व वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ निर्माण होऊन, नागरिकांच्या सुरक्षितता, जिवीतास धोका,अडथळा किंवा गैरसोय होऊ नये म्हणून, अशा मार्गावर वाहतूकीचे नियमन करणे आवश्यक आहे. म्हणून नमुद मार्गावरील वाहतूकीचे नियमन खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

दिनांक २७/०८/२०२४ रोजी १६.०० ते २२.०० वाजेपर्यंत खालील नमूद मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठो बंद राहील.

१) टी.व्ही.सेंटर चौक व परीसर- साक्षी मंगल कार्यालय ते टी.व्ही. सेंटर, हडको कॉर्नर ते टी.व्ही. सेंटर, जिजाऊ चौक ते टी.व्ही.सेंटर, आय पी मेस ते टी.व्ही. सेंटर.

२) कॅनॉट प्लेस व परीसर- एचडीएफसी बँक एटीएम चौक ते कॅनॉट प्लेस, बॉम्बे स्टेशनरी ते कॅनॉट प्लेस, वाय झेड फोर्ड शो रूम ते कॅनॉट प्लेस, बाळासाहेब सानप यांचे कार्यालय ते कॅनॉट प्लेस, सिडको कार्यालया समोरील रस्ता ते कॅनॉट प्लेस पर्यंत

३) गजानन महाराज मंदीर चौक व परीसर- पटीयाला बँक ते गजानन महाराज मंदीर चौक, जवाहरनगर पो.स्टे.समोर आदिनाथ चौक ते गजानन महाराज मंदीर चौक, त्रिमुर्ती चौक ते गजानन महाराज मंदीर चौक, सेव्हनहील उड्डाणपुल ते गजानन महाराज मंदीर.

४) कोकणवाडी चौक व परीसर- पचंवटी चौक ते कोकणवाडी चौक, विट्स हॉटेल वेंदातनगर ते कोकणवाडी चौक, एस.एस.सी. बोर्ड ते कोकणवाडी चौक- सेशन कोर्ट सिग्नल ते कोकणवाडी चौक.

५) गुलमंडी परीसर- पैठणगेट ते गुलमंडी, औरंगाबाद बुक डेपो ते गुलमंडी, बाराभाई ताजिया चौक ते गुलमंडी, सिटीचौक ते गुलमंडी, औरंगपुरा पोलीस चौकी ते बाराभाई ताजिया.

पर्यायी मार्ग :-

१) टी.व्ही.सेंटर चौक व परीसर- जिल्हाधिकारी कार्यालय कडून गणेश कॉलनी मार्गे टी.व्ही. सेंटर कडे येणारी - जाणारी वाहतूक स्वर्ग हॉटेल - एन-१२ मार्गे जातील व येतील.

२) हडको कॉर्नर कडुन टी.व्ही. सेंटरकडे येणारी वाहतूक एन-१२ सिध्दार्थनगर- अण्णाभाऊ साठे चौक येथुन दिल्लीगेट कडे जातील व येतील.

३) सेव्हनहील, एम.जी.एम., सेंट्रल नाकामार्गे टी. व्ही. सेंटरकडे येणारी वाहतूक आय पी मेस चौक येथून बळीराम पाटील हायस्कूल मार्गे जातील व येतील.

४) हर्सूल टी. पॉईंट, जळगाव रोड कडुन टि.व्ही.सेंटर कडे येणारी वाहतूक जिजाऊ चौकातुन एम-२ रोडकडे जातील व येतील.

५) कॅनॉट प्लेस व परीसर- एचडीएफसी बँक एटीएम चौक ते कॅनॉट प्लेसकडे येणारी व जाणारी वाहतूक एन-१ चौक शिवा हॉटेल टी. पॉईंट नान हॉटेल चौक मार्गे जातील व येतील.

६) गजानन महाराज मंदीर चौक व परीसर-पटीयाला बँक ते गजानन महाराज मंदीर चौकाकडे येणारी वाहने हिंदू राष्ट्र चौक - विजयनगर - गजानन कॉलनी - रिलायंस मॉल मार्गे जातील व येतील.

७) जवाहरनगर पो.स्टे. कडून गजानन महाराज मंदीर कडे येणारी वाहने, माणिक हॉस्पीटल-डॉ.हेडगेवार रुग्णालयाचे पाठीमागील रोडने त्रिमुर्ती चौकाकडे जातील व येतील.

८) त्रिमुर्ती चौक कडून गजानन महाराज मंदीरकडे येणारी वाहने डॉ. हेडगेवार रुग्णालयाचे पाठीमागील रोड - माणिक हॉस्पीटल - जवाहरनगर पो.स्टे. मार्गे जातील व येतील.

९) सेव्हनहील उड्डाणपूल कडून गजानन महाराज मंदीरकडे येणारी वाहने जालना रोड मार्गे आकाशवाणीकडे जातील व येतील.

१०) कोकणवाडी चौक व परीसर- पचंवटी चौक ते कोकणवाडी चौकाकडे येणारी वाहने रेल्वेस्टेशन मार्गे जातील व येतील.

११) एस.एस.सी. बोर्ड ते कोकणवाडी चौकाकडे येणारी वाहने ही उस्मानपुरा तसेच चुन्नीलाल पेट्रोलपंप मार्गे जातील.

१२) विट्स हॉटेल वेंदातनगर ते कोकणवाडी चौकाकडे येणारी वाहने ही देवगिरी कॉलेज- आयटीआय- पिरबाजार- उस्मानपुरा मार्गे जातील व येतील.

आवक/जावक क्रमांक 6045
जवाहर पोलीस स्टेशन
छत्रपती संभाजीनगर
दिनांक 26/08/20..

१३) शंभनकोर्ट सिग्नल ते कोकणवाडी चौकाकडे जाणारे वाहने महावीर चौक मार्गे जातील.

१४) **गुलमंडी परीसर-** पैठणगेट ते गुलमंडीकडे जाणारी वाहने ही बाबूराव काळे चौक - निराला बाजार मार्गे जातील व येतील.

१५) अंगुरीबाग कडुन गुलमंडीकडे येणारी वाहने गोमटेश मार्केट मार्गे जातील.

१६) सिटीचौक ते गुलमंडीकडे येणारी वाहने जुना बाजार पोस्ट ऑफीस मार्गे जातील.

१७) औरंगपुरा पोलीस चौकी ते गुलमंडीकडे येणारी वाहने नाथ सुपर मार्केट तसेच कुंभारवाडा मार्गे जातील.

बंदोबस्त प्रभारी अधिकारी हे आवश्यकतेनुसार वाहतूक वळवतील किंवा मार्गात बदल करतील.

सदर अधिसुचना ही पोलीस, रुग्णवाहिका, अग्निशमन दल व अत्यावश्यक सेवेच्या वाहनांना लागु राहणार नाही.

अधिसुचनाचा भंग करणारी व्यक्ती म.पो.कायदा कलम १३१ व अन्य फौजदारी कायद्यान्वये शिक्षेस पात्र राहील.

( सुभाष भुजंग )

सहाय्यक पोलीस आयुक्त,

वाहतूक,छत्रपती संभाजीनगर

प्रति,

पोलीस निरिक्षक,
सायबर सेल, छत्रपती संभाजीनगर

प्रत-

सहाय्यक पोलीस आयुक्त,
गुन्हे, छत्रपती संभाजीनगर